नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २४० | Issue - 240 | वार सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ | Blow- Monday Date 19 January 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## सोलापूर-पुणे महामार्गावर भीषण अपघात; पाच युवकांचा जागीच मृत्यू

### मोहोळ येथील देवडी पाटीजवळ घडली दुर्घटना, एक महिला गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : पुणे-सोलापूर महामार्गावर मो-होळ जवळील देवडी पाटी येथे शनिवारी रात्री १२ च्या सुमारास भरधाव वेगातील एर्टीका गाडीने झाडाला आदळल्याने झालेल्या भीषण अपघातात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर एक म हिला जखमी झाली आहे.

पनवेल येथून अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघालेली एरटीका कार ( एम एच ४६ झेड ४५३६ ) या वाहनाच्या चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने सदर वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळले.

वाहनामध्ये एकूण सहा प्रवासी (तीन पुरुष व तीन महिला) होते. सर्व प्रव-ासी एकमेकांचे मित्र असल्याचे समजून येत आहे. अपघा-तात पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला असून ज्योती जयदास टाकले, रा. सेक्टर ७, पनवेल, जि. रायगड या महिला प्रवासी जखमी झाल्या आहेत. जखमी महिलेस तात्काळ उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, मोहोळ येथे दाखल केले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.



घटनेची माहिती मिळताच म ोहोळ पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस मदत पुरवून आवश्यक कार्यवाही करण्यात आली. अपघाताचा परिणाम अत्यंत भीषण असून मृतदेह पूर्णतः वाहनामध्ये अडकलेल्या अवस्थेत आढळून आले. सदर वाहन रस्त्यापासून अंदाजे १० ते १५ फूट अंतरावर झुडपांमध्ये अडकलेले होते. अपघाताचा तपास मोहोळ पोलीस स्टेशनचे कर्मचारी व अधिकारी करत आहेत.

माला रवी साळवे वय ४० रा. पंचशील नगर झोपडपट्टी सेक्टर नंबर १८ न्यू पनवेल, अर्चना तुकाराम भंडारे वय ४७ रा. सेक्टर ७ खांदा कॉलनी पनवेल वेस्ट, विशाल नरेंद्र भोसले वय ४१ रा. आरबीआय एम एस ओ रूम नंबर ८ रेल्वे कॉलनी पनवेल स्टेशन जवळ पनवेल, अमर पाटील, रा. खार-घर आनंद माळी असे मृत्यूमुखी पडलेल्यांची नावे असून ज्योती जयदास टकले (वय ३७ रा. सेक्टर न १३ पनवेल) या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष

## प्रजासत्ताक दिनी अवतरणार महाराष्ट्रातील 'गणेशोत्सवा'चा भव्य चित्ररथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली(वृत्तसंस्था ) : राजधानी नवी दिल्ली ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सो-हळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे. संरक्षण सचिव राजेशकुमार सिंह यांनी या सोहळ्याच्या तयारीची अधिकृत माहिती दिली. यंदाच्या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उप-स्थितीत कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी साम र्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल. यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, म हाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल. लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच 'बॅटल रे' युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात १८ लष्करी तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील. २,५०० कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला ऑस्कर विजेते संगीतकार एम.एम. कीरावानी यांचे संगीत आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे. यंदाचा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, १०,००० विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यात इस्र-ोचे शास्त्रज्ञ, लखपती दीदी आणि प्रगत शेतकऱ्यांचा समावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी 'राष्ट्रपर्व' हे विशेष पोर्टल आणि प विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर 'भारत पर्व'चे आयोजन केले आहे.

## बदरी-केदारसह चारधाममध्ये मोबाईल बंदी, प्रशासनाची रील आणि फोटोवर कडक नजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : उत्तराखंड सरकारने चारधाम यात्रेची मर्यादा आणि शांतता अबाधित राखण्यासाठी यावर्षी पावले उचल-ली आहेत. शनिवारी ऋषिकेश येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत गढवाल आयुक्त विनय शंकर पांडेय आणि गढवाल आयजी राजीव स्वरूप यांनी यात्रेच्या नियोजनाचा आढावा घेतला.




गेल्या काही वर्षांत मंदिराच्या आव-ारात रील बनवणे, फोटोशूट करणे आणि गाणी लावल्यामुळे विवादाचे प्रसंग निर्माण झाले आहेत. त्यामुळे यावर्षी बदरीनाथम धील सिंहद्वारापासून ते केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्रीच्या गाभाऱ्यापर्यंत मोबाईल नेण्यास मनाई असणार आहे. भाविकांचे मोबाईल सुरक्षित ठेवण्यासाठी मंदिर समि ती आणि जिल्हा प्रशासन ठिकठिकाणी 'मोबाईल लॉकर' किंवा विशेष काउंटरची व्यवस्था करणार आहे. यात्रेकरूंच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांची ड्युटी १५ दिवसांच्या रोटेशनवर लावण्यात येणार आहे. चार डॉक्टरांचे एक पॅनेल तयार केले जाईल, ज्यात तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश असेल. तातडीच्या उपचारांसाठी एअर म्ब्युलन्सचीही सोय केली जाणार आहे. नोंदणी प्रक्रियेत कोणताही बदल नाही; ६०% ऑफलाइन आणि ४०% ऑनलाईन नोंदणी पूर्वीसारखी सुरू रा-हील. हरिद्वारमध्ये सध्या ३८ नोंदणी काउंटर आहेत आणि गरज पडल्यास त्यांची संख्या वाढवली जाईल. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी यमुनोत्री व गंगोत्री मार्गावर मोठ्या बसेसऐवजी 'छोटी शटल बस सेवा' सुरू करण्याचा विचार आहे. एनएच आणि बीअ-ारओला ३१ मार्चपर्यंत सर्व रस्ते दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यावर्षी चारधाम यात्रेसाठी मोठे आव्हान आहे, कारण २०२३ मध्ये विक्रमी ५६ लाख पर्यटकांनी यात्रा केली होती. प्रशासनाने ६.३५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली असून तयारी 'फास्ट ट्रॅक' मोडवर सुरू आहे. या निर्णयामुळे मंदिरांमध्ये केवळ भक्तीचे वातावरण रा-हील आणि भाविकांना अडथळ्याशिवाय दर्शन घेता येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२६ साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसकडे रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (थएऋ) २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी दा-वोस, स्वित्झर्लंडकडे रवाना झाले आ-हेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.



जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून जग या नव्या 'महा-ग्रोथ' गाथेकडे अपे-क्षेने पाहत आहे. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी थएऋ २०२६ महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. गेल्यावर्षी १६ लाख कोटींचे गुंतवणूक करार महाराष्ट्राने केले होते. यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे. दावोस येथे होणाऱ्या या परिषदेदरम्यान जागतिक उद्य-ोगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

## सोलापूर शहरात १५ दिवस ड्रोन उडवण्यास बंदी; पोलीस आयुक्तांचा आदेश

सोलापूर: सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि सुरक्षेच्या कारणास्तव दि. १७ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सर्व प्रकारचे ड्रोन आणि मानवरहित हवाई यंत्रे उडवण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, कलम १६३ (१) अन्वये हे मनाई आदेश जारी केला आहे. हा आदेश १७ जानेवारी २०२६ (००:०१ वा.) पासून ३१ जानेवारी (२४:०० वा.) पर्यंत लागू असेल. समाजकंटकांकडून ड्रोनचा वापर करून राष्ट्रीय सुरक्षेच्या ठिकाणांना धोका निर्माण होऊ शकते ,अशी शक्यता गृहीत धरून खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि इतर संबंधित कायद्यांनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इश-ारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

**नगरसेवकांच्या कामातून शिवसेनेची प्रतिमा स्वच्छ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख राहिली पाहिजे** — उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मुंबईतल्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांशी साधला संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वॉर्ड विकासासाठी सत्त-ेचा वापर करा, कामांचे शॉर्ट, मिड आणि लाँग टर्म नियोजन ठरवा आणि मत दिले-न दिले अशा प्रत्येक नागरिकासाठी समान न्यायाने काम करा, असे ठाम आणि स्पष्ट निर्दे श उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांना दिले. नगरसेवकांच्या कामातून शिवसे-नेची प्रतिमा स्वच्छ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख राहिली पाहिजे. नागरिकांच्या मनात नगरसेवकांविषयी एकही चुकीचा विचार निर्माण होऊ नये, हाच आपल्या कामाचा खरा निकष असावा, असे त्यांनी ठासून सांगितले.

मुंबईतील वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यानंतर त्यांनी शिवसेनेच्या सर्व २९ नवनिर्वाचित नगरसेवकांशी सविस्तर संवाद साधत विकास, स्वच्छता, पारदर्शक कारभार आणि लोकाभिमुख कामकाजाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी शिवसेना सरचिटणीस राहुल शेवाळे, शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना प्रवक्त्या सौ. शीतल म्हात्रे आणि शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे हे उपस्थित होते.

शिंदे म्हणाले की, आपल्या प्रभागात लोकांना प्रत्यक्ष दिसून येईल असा बदल झाला पाहिजे. आपण केलेली कामे लोकांच्या लक्षात यायला हवीत. शिवसेनेची प्रतिमा डागाळली जाईल असे कोणतेही काम आपल्या हातून घडू नये, याची प्रत्येक नगरसेवकाने विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देत संपूर्ण प्रभागाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सकाळी उठून आपल्या वॉर्डमध्ये साफसफाई झाली आहे की नाही याची पाहणी करा. कुठे खड्डे पडले असतील तर तात्काळ दुरुस्ती करून घ्या. कचरा साचलेला दिसायला नको, नाल्यांमध्ये कचरा कोंडीतून अडलेला नसावा. संपूर्ण वॉर्ड चकाचक आणि स्वच्छ दिसायला हवा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. 'डीप क्लीन ड्राइव्ह'सारखे प्रयोग आपल्या प्रभागात राबवा आणि संपूर्ण यंत्रणा वापरून प्रभाग स्वच्छ ठेवा, असा सल्लाही त्यांनी दिला.

निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व नगरसेवकांचे मनापासून अभिनंदन करताना त्यांनी सांगितले की, यावेळी १९ 'लाडक्या बहिणी' विजयी झाल्या आहेत. पराभूत झालेल्या उमेदवारांनी खचून न जाता आपल्या प्रभागात शिवसेनेचे काम सुरू ठेवावे. छोट्या-मोठ्या चुकांमुळे काही उम ेदवार पराभूत झाले असले तरी त्यांनी लोकांसाठी काम करत राहावे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

निवडून आलेल्या प्रत्येक नगरसेवकाने स्वतःच्या प्रभागासोबतच आणखी एक-दोन प्रभागांच्या विकासासाठीही पुढाकार घ्यावा.



नागरिकांच्या मनात नगरसेवकांबद्दल कोणताही प्रतिकूल विचार निर्माण होऊ नये. लोकांच्या मनात विश्वास आणि सकारात्मक भावना निर्माण झाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जुन्या नगरसेवकांनी नव्या नगरसेवकांना मार्गदर्शन करावे. निधी कसा मिळवायचा, प्रस्ताव कसे द्यायचे आणि कामांचा पाठपुरावा कसा करायचा, याची माहिती नव्या नगरसेवकांना द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

गेल्या साडे तीन वर्षांत आपण केलेल्या विकासकामांमुळेच म ुंबईकर नागरिकांनी आपल्याला संधी दिली आहे, असे सांगत शिंदे म्हणाले की, विरोधकांनी भावनेच्या मुद्द्यावर निवडणूक लढवली, तर आपण विकासाला प्राधान्य दिले. लोकांनी भावनिकतेला नाकारून विकासाला मतदान केले, हेच या निकालातून स्पष्ट झाले आहे.

ते पुढे म्हणाले की, शिवसेनेने या निवडणुकीत ९० जागा लढवल्या असून पक्षाला ३२ टक्के मते मिळाली आहेत. विधानसभा निवडणूक असो वा ग्रामपंचायत निवडणूक, शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर राहिली आहे. महाराष्ट्रातील जनतेने काही पक्षांना पाचव्या क्रमांकावर ढकलले असून, जनतेच्या कोर्टात जाणाऱ्यांना मतदारांनी घरी पाठवले आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

नगरसेवक हा विकासाचा म हत्त्वाचा दुवा असल्याचे सांगत शिंदे म्हणाले की, नवीन बांधकामांच्या कामात अडथळे आणू नका. छोट्या अडचणी तात्काळ सोडवा. ओसी (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) देण्याचा निर्णय घेतला असून, आपल्या प्रभागातील इमारती शोधून त्यांची प्रलंबित कामे पूर्ण करून द्या.

पुनर्विकासासाठी अडकून पडलेल्या इमारतींच्या प्रकल्पांना गती द्या. एसआरए क्लस्टर प्रकल्प राबवले जात असून भविष्यात लाखो घरांची निर्मिती होणार आहे. रखडलेल्या प्रकल्पांना प्राधान्य देऊन त्यांना चालना द्या. घराचा मुद्दा योग्य पद्धतीने हाताळलात तर लोकांच्या मनात विश्वास निर्माण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महिला बचत गटांसाठी नगरविकास विभागाकडून रिव्हॉल्विंग फंड दिला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महिला बचत गटांना २० ते ३० हजार रुपयांची मदत देण्यात आली असून, 'लाडक्या बहिणीं'ना ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्रत्येक वॉर्डमध्ये किमान दोन ते तीन मोठी विकासकामे उभी राहिली पाहिजेत, ज्यातून नागरिकांना प्रत्यक्ष बदल जाणवेल. मार्केट, अभ्यासिका आणि दवाखाने उभारण्यावर भर द्या. लोक सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडतात तेव्हा विकासकामे सुरू असल्याचे त्यांना दिसायला हवे, असेही त्यांनी सांगितले.

विरोधी पक्षांशी वाद घालण्यापेक्षा समन्वय ठेवा. गोड बोलून त्यांनाही सोबत घ्या आणि टप्प्याटप्प्याने कामे पूर्ण करा, असा सल्ला देत शिंदे यांनी सांगितले की, या निवडणुकीत राहिलेल्या त्रुटी दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. संपूर्ण प्रभागात टप्प्याटप्प्याने बदल झालेला दिसला पाहिजे. जे निर्णय घेतले आ-हेत, त्यांची प्रभावी अंमलबजावणी करा, असे आवाहन त्यांनी सर्व नगरसेवकांना केले.

## संपादकीय....

### आत्मनिर्भरतेचे प्रतीक


राजधानी नवी दिल्ली ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे. कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल. यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, महाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल. लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच 'बॅटल रे' युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे.

# खोटी एफआयआर दाखल करणाऱ्यांवर खटला चालणार; खोटे साक्षीदारही कारवाईपासून सुटणार नाहीत!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खोटी एफआयआर दाखल करण्याच्या वाढत्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाने दूरगामी परिणाम करणारा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. खोटी एफआयआर नोंदविणारे तक्रारदार तसेच त्यांच्या साक्षीदारांविरोधातही थेट फौजदारी कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले आहेत. कायदेशीर प्रक्रिया डावलणारे पोलीस अधिकारी तसेच न्यायिक दंडाधिकारी यांनाही जबाबदारीपासून सूट दिली जाणार नसल्याचे न्यायालयाने ठामपणे नमूद केले आहे.

न्यायमूर्ती प्रवीण कुमार गिरि यांच्या एकलपीठाने दिलेल्या या निर्णयानुसार, एखाद्या प्रकरणात तपासाअंती गुन्हा सिद्ध न झाल्यास (फायनल/क्लोजर रिपोर्ट दाखल होत असल्यास) तपासी अधिकाऱ्याने केवळ अंतिम अहवाल सादर करणे पुरेसे ठरणार नाही. तर खोटी माहिती दिल्याबद्दल तक्रारदार व एफआयआरमधील साक्षीदारांविरोधात स्वतंत्र लिखित तक्रार सादर करणे बंधनकारक राहील.




न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २१२ व २१७ (पूर्वीची भादंवि कलमे १७७ व १८२) अंतर्गत पोलिसांना खोटी माहिती दिल्याबद्दल कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच, बीएनएसएस कलम २१५(१)(अ) (पूर्वीची दंप्रसं कलम १९५(१)(अ)) अंतर्गत न्यायालयाने संज्ञान घेण्यासाठी अशा तक्रारी आवश्यक ठरतील. अन्यथा, तपासी अधिकारी, ठाणेप्रमुख, परिपत्रक अधिकारी (सर्कल ऑफिसर) तसेच संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांविरोधात विभागीय कारवाई व न्यायालयीन अवमानाची कार्यवाही होऊ शकते, असेही न्यायालयाने बजावले आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने राज्याचे पोलीस महासंचालक (DGP) यांना अधीनस्थ अधिकाऱ्यांसाठी स्पष्ट आदेश जारी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, सर्व न्यायिक दंडाधिकाऱ्यांना असे निर्देश देण्यात आले आहेत की, कथित आरोपीच्या बाजूने क्लोजर रिपोर्ट सादर झाल्यास संपूर्ण केस डायरी मागवून तिचा सखोल अभ्यास करावा. त्यानंतर, तपासी अधिकाऱ्यांना सूचक (तक्रारदार) व एफआयआरमधील साक्षीदारांविरोधात लेखी तक्रार दाखल करण्याचे आदेश द्यावेत.

न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, संज्ञान घेण्यापूर्वी न्यायिक दंडाधिकाऱ्यांनी संपूर्ण केस डायरी व कागदपत्रांचा अभ्यास करावा. प्रथमदृष्ट्या वेगळे चित्र दिसल्यास तक्रारदाराकडून 'प्रोटेस्ट पिटीशन' मागवून त्यावर सुनावणी घ्यावी. सुनावणीनंतर गुन्हा झाल्याचे आढळल्यास दंड प्रक्रिया संहिता कलम १९०(१)(अ) किंवा १९०(१)(ब) अंतर्गत योग्य संज्ञान घ्यावा.

हा निर्णय खोटी एफआयआर, सूडबुद्धीने दाखल होणारे गुन्हे आणि न्यायप्रक्रियेच्या दुरुपयोगावर प्रभावी अंकुश आणणारा ठरणार असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

# ७७ वा प्रजासत्ताक दिन: राष्ट्रपती भवनातील 'अॅट होम' सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांना विशेष निमंत्रण






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित होणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठित 'अॅट होम' (ीं केश) स्वागत समारंभासाठी महाराष्ट्रातील चार मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या वतीने रायगड सगुणा बागचे चंद्रशेखर भडसावळे, नांदेडचे सर्पदंश तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे, जळगावचे अरविंद गुलाब चौधरी आणि मुंबईचे स्टार्टअप उद्योजक आकाश शहा यांना विशेष निमंत्रण पाठविण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील सगुणा बागचे संस्थापक आणि सुप्रसिद्ध 'कृषिरत्न' श्री. चंद्रशेखर हरि भडसावळे यांच्या शेती, नैसर्गिक शेती, शून्य-नांगरणी तंत्र (डठढ), जलसंवर्धन, कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रामधील उल्लेखनीय कामगिरीची दखल या निमित्ताने घेण्यात आली आहे. १९७६ पासून शेती क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री. भडसावळे यांनी नेरळ येथील 'सगुणा बाग'ला एकात्मिक शेतीचा एक जागतिक दर्जाचा आदर्श नमुना म्हणून विकसित केले आहे. मत्स्यव्यवसाय, वनशेती, फलोत्पादन, गो-पालन आणि पर्यटन यांची सांगड घालणारे हे मॉडेल आज देशभरातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले असून, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास उंचावण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. वैद्यकीय क्षेत्रातील मानवतावादी कार्याबद्दल नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथील विख्यात तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे यांना हे विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथून एम.डी. पदवी प्राप्त केल्यानंतर, शहरात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक अतिमागास आणि डोंगराळ अशा मुखेड भागाची रुग्णसेवेसाठी निवड केली. गेल्या ३० वर्षांपासून त्यांनी सर्पदंशावरील उपचारांत क्रांती घडवून आणली आहे. १९८८ मध्ये मुखेड परिसरात सर्पदंशामुळे होणारा २५ टक्के मृत्यूदर आज डॉ. पुंडे यांच्या शास्त्रीय उपचार पद्धतीमुळे शून्य टक्क्यांवर आला आहे. त्यांच्या या कार्याची जागतिक आरोग्य संघटनेने (थक्ज) दखल घेऊन त्यांची निवड 'राष्ट्रीय सर्पदंश मार्गदर्शन समिती'मध्ये केली आहे.

याच सोहळ्यासाठी जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथील श्री. अरविंद गुलाब चौधरी यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री आवास योजने'चा लाभ घेऊन आपले हक्काचे घर मिळवणाऱ्या यशस्वी लाभार्थ्यांचे प्रतिनिधित्व ते या सोहळ्यात करणार आहेत. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना सर्वसामान्यांच्या जीवनात कसा बदल घडवत आहेत, याचे ते जिवंत उदाहरण ठरले आहेत.

तसेच, मुंबईचे युवा उद्योजक श्री. आकाश शहा यांना स्टार्टअप्स आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील विशेष योगदानासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीत स्टार्टअप्स महत्त्वाची भूमिका बजावत असताना, आकाश शहा यांनी या क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीची दखल राष्ट्रपती भवनाकडून घेण्यात आली आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडणारा 'अॅट होम' हा एक अत्यंत प्रतिष्ठित सोहळा मानला जातो.

# भारतीय नौदलाची फर्स्ट ट्रेनिंग स्क्वाड्रन सिंगापूरमधील चांगी नौदल तळावर दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आयएनएस तीर, आयएनएस शार्दूल, आयएनएस सुजाता तसेच भारतीय तटरक्षक दलाचे 'सारथी'' हे जहाज यांचा समावेश असलेली भारतीय नौदलाची फर्स्ट ट्रेनिंग स्क्वाड्रन (वनटीएस) १५ जानेवारी २०२६ रोजी सिंगापूर येथील चांगी नौदल तळावर दाखल झाली. ही स्क्वाड्रन दक्षिण-पूर्व हिंदी महासागर क्षेत्रात प्रशिक्षण मोहिमेवर आहे.

ही मोहीम विशेष महत्त्वाची ठरते कारण २०२६ हे वर्ष 'आसियान-भारत सागरी सहकार्य वर्ष २०२६' म्हणून साजरे केले जात आहे.

या भेटीदरम्यान भारतीय नौदल आणि सिंगापूर प्रजासत्ताक नौदलाच्या कर्मचाऱ्यांमध्ये क्षमतावृद्धी आणि सागरी सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने विविध बंदर-संबंधित उपक्रम आणि व्यावसायिक संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. यामध्ये नियोजित प्रशिक्षण देवाण-घेवाण कार्यक्रम, संयुक्त योग सत्रे तसेच दोन्ही नौदलांच्या प्रशिक्षणार्थींमध्ये होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचा समावेश आहे.

तसेच सांस्कृतिक उपक्रमांतर्गत सिंगापूरमधील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी भारतीय नौदल बँडचे सादरीकरण होणार आहे. या कालावधीत शालेय विद्यार्थ्यांसाठी जहाजांना भेट देण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या स्क्वाड्रनच्या आगमनानंतर सिंगापूरमधील भारताचे उच्चायुक्त डॉ. शिलपक अंबुले यांनी वनटीएसच्या प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. तसेच वनटीएसचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित जहाजांचे कमांडिंग अधिकारी यांनी सागरी प्रशिक्षण व सिद्धांत कमांडचे कमांडर (एमटीडीसी) यांची भेट घेतली. माहिती संलयन केंद्रातील आंतरराष्ट्रीय संपर्क अधिकाऱ्यांच्या पथकाच्या भेटीदरम्यान व्यावसायिक अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली. भेटीच्या दुसऱ्या दिवशी स्थानिक समुदायाशी संवाद आणि सिंगापूर प्रजासत्ताक नौदलासोबत विविध उपक्रम राबविण्यात आले. माहिती संलयन केंद्र आणि सिंगापूर प्रजासत्ताक नौदल संग्रहालयाला भेटी, मैत्रीपूर्ण क्रीडा स्पर्धा तसेच श्री नारायण वृद्धाश्रम आणि नर्सिंग होम येथे जनसंपर्क उपक्रम हे या दिवसातील प्रमुख आकर्षण ठरले.

# मोहेकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण म.कसबे : धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात प्राचार्य डॉ. हेंमत भगवान सर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय व चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्थामाता कै. सुमनबाई (वहिनी) मोहेकर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभास माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संदीप मडके बीड कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ अशोकराव मोहेकर हे होते.

यावेळी बोलताना माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक संदीप मडके म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात जिंकन किंवा हारण महत्त्वाचं नसुन, स्पर्धेत सहभागी होऊन टिकून राहून हेच खरे यश असून आपला आत्मविश्वासच आपल्या जीवनात विजयश्री खेचून आणू शकतो असे पटवून देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शालेय गटातील ४२ व महाविद्यालयीन गटातील १६ असे ५८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. शालेय गटात वसुंधरा संजय गुरव प्रथम क्रमांक तर राशी हनुमंत खोत द्वितीय क्रमांक

व विरेन गणपती अडसूळ याने तृतीय क्रमांक पटकावला. तर महाविद्यालय गटात साक्षी बाळासाहेब वाटाणे प्रथम क्रमांक तर प्रतिक्षा शिवाजी विणकर द्वितीय क्रमांक व समर्थ लक्ष्मण लोंढे तृतीय क्रमांक पटकावला.कार्यक्रमांचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन डॉ दिपक सुर्यवंशी यांनी केले. पारीतोषिक वाचन डॉ दादाराव गुंडरे यांनी केले.

# भादा जिल्हा परिषद गटात संगीता गोडभरले यांना जनतेतून पहिली पसंती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : भादा जिल्हा परीषद गटातील जनता आपल दैवत मानुन जनसेवा करणार ,भादा मतदार संघातील महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण विकासाला चालना देणार सौ,संगीता ज्ञानोबा गोडभरले ,,,,

औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद गटातुन ओबीसी प्रवर्गातुन काँग्रेस पक्षाच्या वतिने निवडणुक लढण्यासाठी ओ .बी. सी चेहरा सौ. संगीता ज्ञानोबा गोडभरले या सक्षम महिला उमेदवार असुन राजकारणाचा प्रदिर्घ अनुभव असलेले सरपंच ज्ञानोबा बळीराम गोडभरले यांनी लखनगाव गावचा चेहरा मोहरा बदलला असुन कॉग्रेस पक्षाशी एकनिष्ठता दाखउन गेल्या तीस वर्षापासुन ८० टक्के समाजकारण तर २० टक्के राजकारण करत भादा जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावात त्यांचा असलेला दांडगा जनसंपर्क पाहता भादा जिल्हा परिषद गटातून संगीता ज्ञानोबा गोडभरले यांनी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवावी असे सर्वसामान्य लोकातून बोलले जाते. ज्ञानोबा गोडभरले यांनी आपल्या तीस वर्षाच्या सक्रीय राजकीय कार्यकाळात लखनगाव ग्रामपंचायतचे सरपंच ,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य असे अनेक पद भुषवित सरपंच उपसरपंच कार्यकाळात अनेक लोकोपयोगी कामे करत सर्वसामान्यांचे नेतृत्व करणारा हक्काचा माणूस म्हणून काम केला आहे,,, गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सदस्य पदासाठी निवडणूक जाहीर होताच औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद गट हा ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाला असून या भादा गटातून संगीता गोडबोले या काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढण्यासाठी आग्रही आहेत सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेबांच्या अत्यंत जवळचे ,आमदार अमित भैया देशमुख यांच्या मर्जीतले ,मा. आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज भैया देशमुख यांच्या मनातले कार्यकर्ते म्हणून ज्ञानोबा गोडभरले यांची ओळख आहे, तर भादा जिल्हा परिषद गटातील लखनगाव या गावचे रहिवासी असलेले ज्ञानोबा बळीराम गोडबोले यांच्या सुविद्य पत्नी सौ संगीता ज्ञानोबा गोडभरले यांना जिल्हा परिषद भादा गटातून उमेदवारी मिळावी अशी जनतेतून एकमुखी मागणी होत आहे, गेली दहा वर्ष लखनगाव ग्राम पंचायत मध्ये सदस्य असणाऱ्या संगीता गोडबोले व त्यांचे पती ज्ञानोबा गोड भरले यांना जिल्हा परिषद गट मतदार संघाची संपूर्ण माहिती असून प्रत्यक्षरीत्या ते सर्व मतदारांना ओळखतात व व भादा गटातील लोकांशी असलेलं प्रेमाचं व जिव्हाळ्याचं नातं त्यामुळे त्यांचा भादा गटात दांडगा जनसंपर्क असल्याचं बघायला मिळतं, काँग्रेसचे कार्यकर्ते तथा लखनगाव चे सरपंच ज्ञानोबा बळीराम गोडभरले हे लखनगाव ग्रामपंचायत मध्ये दहा वर्षे सरपंच पाच वर्षे उपसरपंच व पाच वर्ष सदस्य म्हणून त्यांनी काम केलं आहे जनसामान्यात स्वच्छ प्रतिमा प्रशासनाची जाण तळागाळातील नागरिकांच्या प्रश्नांची जाण ,असणारे व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ज्ञानोबा गोडभरले यांची नेहमीच तळमळ असते.

संगीतात ज्ञानोबा गोडभरले यांनी आपल्या दहा वर्ष ग्रामपंचायत सदस्य कार्यकर्ते महिलांची एकजूट करून महिला सक्षमीकरण करत त्यांनी सतत काँग्रेस पक्षासाठी काम केलेला आहे ,बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात संगीता गोडभरले या स्थानिक उमेदवार असताना त्यांच्या नावाला मतदारसंघातुन पसंती पहिली पसंती येत असून काँग्रेस पक्षही त्यांच्या आजवरच्या कामाची पावती म्हणून भादा जिल्हा परिषद गटातून त्यांना उमेदवारी पक्ष देईल अशी भादा गटातील लोकांची अपेक्षा आहे ,कॉग्रेस पक्षाने बाहेरचा उमेदवार लादु नये अशी ही विनंती मतदार संघातील लोकांच्या चर्चेतून होताना दिसून येत आहे,

ज्ञानोबा बळीराम गोडभरले यांनी गेल्या वीस वर्षात ग्राम पंचायतच्या माध्यमातून लखनगाव गावात गावातील अंतर्गत सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक रस्ते ,लोकांच्या आरोग्यासाठी फिल्टर युक्त पाणी गावच्या लोकांना दील असुन.सहकारमहर्षी दिलीपराव देशमुखु व ग्रामिण चे आमदार धिरज देशमुख यांच्या निधीतुन व विवीध योजनेतुन ग्रामपंचायतच्या माध्यमातून,

सुसज्य ग्रामपंचायत ईमारत उभारणी केली असुन जिल्हा परिषद शाळेचा सर्वांगीण विकास, गावचा पाणी प्रश्न कायमचा मीटावा यासाठी लखनगाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करून गावातील पाणी प्रश्न कायमचा मीटवला असुन कोरोना काळात निराधारणा आधार देण्यासाठी निराधारांच्या पगारी घरपोच देण्याची सेवा ज्ञानोबा गोडभरले यांनी केली आहे, ज्ञानोबा घोडबले यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना मी माझ्या लखनगाव गावच्या विकासात कुठेही कमी पडलो नाही तर येणाऱ्या काळात मला भादा जिल्हा परिषद गटातील लोकांची सेवा करण्याची तीव्र इच्छा असून मला काँग्रेस पक्षाने जिल्हा परिषद लढवण्यासाठी ताकद द्यावी व मी माझा भादा मतदार संघातील लोकांची सेवा करण्याची संधी मीळावी अशी एक जनतेचा सेवक मनुन जनसेवा करण्या माझा संकल्प असल्याच ज्ञानोबा गोडभरले यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रुप डोहोळे ग्रामपंचायतीत कलाकारांचा नागरिकांशी संवाद

## शासनाच्या अभियानाला गती - विविध उपक्रमांचे उद्‌घाटन व जनजागृती कार्यक्रम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रति/मिलिंद जाधव : ठाणे जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे १८ जानेवारी २०२६ रोजी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गावाच्या सर्वांगिण विकासासाठी नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता महाराष्ट्राचे लाडके कलाकार 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव उपस्थित होते.

पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम व तारपा नृत्याच्या सादरीकरणासह वारकरी संप्रदायाने टाळ-मृदंगाच्या गजरात पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान गार्डन बोर्डाचे उद्घाटन, घरकुल गृहप्रवेश, ऑक्सिजन पार्क, आय लव्ह डोहोळे गार्डन, ॲम्ब्युलन्स उद्घाटन तसेच वॉटर एटीएमची पाहणी करण्यात आली. अभियानाच्या अनुषंगाने वॉल पेंटिंग व जिल्हा परिषद शाळांची पाहणीसुद्धा करण्यात आली. यावेळी स्वयं-सहायता बचतगटांचे स्टॉल लावण्यात आले होते.

डोहोळेपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले तर चिंबीपाडा शाळेतील विद्यार्थ्यांनी महिला सुरक्षा - काळाची गरज या सामाजिक विषयावरील पथनाट्य सादर केले. चला एकत्र येऊया, डोहोळे ग्रामपंचायतीला आणि त्यात समाविष्ट गावांना समृद्ध बनवूया असा सामूहिक संकल्पही नागरिकांनी केला.

या कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक छायादेवी सिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, सहाय्यक गटविकास अधिकारी पंडित राठोड, गटविकास अधिकारी गोविंद खामकर, विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे व जनसंपर्क अधिकारी रेश्मा आरोटे तर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रम यशस्वी करण्यात सरपंच सुमन वाघे, उपसरपंच सचिन घोडविंदे, लिपिक एकनाथ जाधव तसेच ग्रुप ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# बार्टीच्यावतीने समतादूत व प्रकल्प अधिकारी यांच्या १९ व २० जानेवारी रोजी राज्यस्तरीय कार्यशाळेचे महाड येथे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थे अंतर्गत शासनाच्या विविध योजनांचा प्रसार -प्रसार करणाऱ्या संपूर्ण राज्यभरातील समतादूत व प्रकल्प अधिकारी यांच्या दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन क्रांतीभूमी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये १९ व २० जानेवारी रोजी करण्यात आल्याची माहिती समतादूत प्रकल्पाचे प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी दिली.

राज्यभरातील प्रत्येक तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, लोकराजा शाहू महाराज, क्रांतीससूर्य महात्मा जोतिराव फुले, सावित्री, जिजाऊ, रमाई आदी समतावादी महापुरुषांच्या समतेच्या विचाराचा प्रसार,प्रचार तसेच भारतीय राज्यघटनेतील संविधानिक मूल्यांचा प्रसार व प्रचार संपूर्ण राज्यामध्ये करण्याचे महत्वपूर्ण काम करत असतात.

समतादुतांच्या कार्याला अधिक गती येण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड जिल्हा रायगड येथे दिनांक १९, २० जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, तसेच बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी बार्टी संस्थेचे निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण उल्हास शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत दोन दिवस भरगच्च कार्यक्रम असून समतादुतांना विविध कौशल्य, ज्ञान देऊन त्यांची क्षमता वृद्धी करण्यात येणार आहे. पहिल्या सत्रात कार्यालयीन शिस्त याविषयी निबंधक विशाल लोंढे, आणि समतादुताची कार्यप्रणाली व भविष्यातील दिशा याविषयी विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड हे मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. विकास आवटे, मुंबई, डॉ दत्ता कोहीनकर, प्रसिद्ध व्याख्याते पुणे, संमोहन तज्ञ नवनाथ गायकवाड, पुणे हे या कार्यशाळेला संबोधित करतील. तसेच या कार्यशाळेमध्ये 'एआय' या प्रणालीचा वापर समता दुतांच्या कामकाजामध्ये कसा करावा, याबाबत सुनील पाटील हे मार्गदर्शन करणार आहेत. समताधदुतांसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या ऑनलाईन प चे उद्घाटनही या कार्यशाळेत होणार आहे.

२० जानेवारी रोजी समता दुतांच्या माध्यमातून संविधान जनजागृती कशी करावी याविषयी सुमेध थोरात, व सतीश पाईकराव हे सादरीकरण करतील.

मी रमाई बोलतेय हा एकपात्री प्रयोग प्रा.रमणी सोनवणे पुणे या सादर करणार असून हा प्रयोग २० जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० ते ६.३० होणार आहे. त्याचबरोबर १९जानेवारी रोजी सायंकाळी ६.०० ते ७.३० या वेळेत 'मी तुमची सावित्री 'हा एकपात्री प्रयोग मेघना झुंझुम या सादर करणार आहेत.त्याच रात्री ९.०० ते १०.३० या वेळात प्रसिद्ध समोहन तज्ञ नवनाथ गायकवाड यांचा कार्यक्रम होईल. हे सर्व कार्यक्रम प्रबोधनाच्या अनुषंगाने सर्वांसाठी खुले राहणार असून जनतेने या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले आहे.

# फातिमाबी साहित्य संमेलनात प्रवीण बागडे यांचा काव्यवाचनासाठी सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीरामपूर/प्रतिनिधी : भारताच्या पहिल्या मराठी मुस्लिम महिला शिक्षिका फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी ऑकेशन्स बँक्वेट हॉल, बेलापूर रोड येथे आयोजित चौथे राज्यस्तरीय युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनातील कवी संमेलन सत्रात सामाजिक आशय असलेल्या प्रभावी काव्यवाचनासाठी नागपूर येथील साहित्यिक प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा गौरव करण्यात आला.

'युगस्त्री फातिमा माई' या विषयावर तसेच सामाजिक वास्तव मांडणाऱ्या कवितांच्या सादरीकरणासाठी दोन्ही कवींना मराठी भाषांतरित पवित्र कुरआन, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल साहित्यिक वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. फातिमा शेख यांच्या कार्याचा गौरव करताना फातिमाबी शेख प्रतिनिधिक काव्यसंग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर यांनी, फातिमाबींची जयंती शाळा-महाविद्यालये तसेच शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये व्यापक पातळीवर साजरी व्हावी, तसेच त्यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ठोस प्रयत्न होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

कविसंमेलन नूरजहां शेख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या कवींनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन खाजाभाई यांनी केले, तर आभारप्रदर्शन शफी सैय्यद यांनी केले. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि प्रबोधनाचा वारसा जपणाऱ्या फातिमाबी शेख यांच्या स्मृतीला उजाळा देणारे हे संमेलन साहित्यप्रेमींमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरले.

# विभाग नियंत्रक धाराशिव यांचे कडक आदेश; एसटीच्या प्रवासामध्ये दिव्यागांना मिळणार हक्काचे सीट!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये दिव्यांग प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधा प्रत्यक्षात केवळ कागदावरच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. दिव्यांगांसाठी राखीव असलेली आसने बळकावली जात असून, प्रवासादरम्यान त्यांना अपमानास्पद, उद्धट आणि हिन दर्जाची वागणूक दिली जात असल्याच्या गंभीर तक्रारी सातत्याने वाढत आहेत. इतकेच नव्हे, तर शासनमान्य णऊखऊ ओळखपत्र थेट नाकारण्याचे प्रकार घडत असल्याने एसटी महामंडळाची प्रतिमा मातीमोल होत आहे.

या पार्श्वभूमीवर अखेर एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाला जाग आली असून, दिव्यांग प्रवाशांचे हक्क डावलणाऱ्या प्रवाश्यावर लगाम घालण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. सर्व विभाग नियंत्रक व आगार व्यवस्थापकांना दिव्यांग प्रवाशांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे सक्त निर्देश देण्यात आले आहेत.

दिव्यांगांच्या कायदेशीर हक्कांवर गदा खपवून घेतली जाणार नाही अशी एसटी महामंडळाने ठाम भूमिका घेत स्पष्ट केले आहे. दिव्यांग प्रवाशांसाठी राखीव असलेली आसने कोणत्याही परिस्थितीत इतर प्रवाशांसाठी वापरता येणार नाहीत.तसेच बस मार्गावर कुठल्याही थांब्यावर दिव्यांग प्रवासी चढल्यास, सदर आसन रिकामे करून देण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित वाहकाची राहील. तर णऊखऊ कार्ड (मूळ किंवा झेरॉक्स प्रत) नाकारण्याचा वाहकाला कोणताही अधिकार नाही.तसेच दिव्यांग प्रवाशांशी उद्धट, अपमानास्पद किंवा हिन दर्जाची वागणूक झाल्यास ती गंभीर शिस्तभंगाची बाब मानली जाईल. तसेच तक्रार आली तर थेट कारवाई करण्यात येईल असे महाव्यवस्थापक (वाहतूक) यांनी दिलेल्या आदेशानुसा म्हटले आहे.

- दिव्यांग प्रवाशांबाबत तक्रारी आल्यास संबंधित वाहक, पर्यवेक्षक, तपासणीस अधिकारी तसेच आगार व्यवस्थापकांवर थेट कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
- सूचनांचे पालन न केल्यास विभाग नियंत्रकांवरही जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.
- कर्मचाऱ्यांच्या विशेष बैठका घेऊन स्पष्ट सूचना देणे
- दप्तरी नोंदी ठेवून वाहकांच्या स्वाक्षऱ्या घेणे
- आरक्षण खिडकीवरील कर्मचाऱ्यांमध्ये सक्तीने जागरूकता निर्माण करणे

हे सर्व आदेश तात्काळ अंमलात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**दिव्यांग प्रवासी ओझे नाहीत - पण अपमान सहन करणार नाहीत!**

एसटी महामंडळाच्या या कडक आदेशांमुळे दिव्यांग प्रवाशांवर होत असलेला अन्याय थांबेल की, हे आदेशही पूर्वीप्रमाणे फक्त फाईलपुरतेच मर्यादित राहतील, हा प्रश्न अद्याप कायम आहे. मात्र, यापुढे तक्रारी आल्यास कारवाई अटळ असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट आणि कठोर इशारा प्रशासनाने दिला आहे.

धाराशिव विभाग नियंत्रक पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यातील दिव्यांगांना सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**मराठी व कन्नड शाळेच्या मुलांचा स्नेहमय व हृदयस्पर्शी वनभोजन**

**प्रतिष्ठित नागरिकांनी शब्दातीत कृतज्ञता केली व्यक्त**

# प्रगतशील शेतकरी शिवपाद अंकलगी परिवारांचा दहा वर्षापासून स्तुत्य उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगांव बु.(ता.अक्कलकोट) येथील प्रगतशील शेतकरी, शिक्षणप्रेमी, व सामाजिक जाणिवेचे प्रतीक असलेले शिवपाद अंकलगी यांनी आपल्या शेतात आयोजित केलेला भव्य, स्नेहमय व हृदयस्पर्शी मुलांचा वनभोजन कार्यक्रम सर्वांच्या मनावर अमीट ठसा उमटवून गेला. वनभोजनाचा कार्यक्रम सामाजिक व शैक्षणिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवावा असा ठरला.



जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा, कुंभार वस्ती मराठी शाळा, पाटील वस्ती मराठी शाळा तसेच गावातील तीनही अंगणवाड्यांमधील चिमुकल्या बालकांना एकत्र आणून शेकडो मुलांना प्रेम, मायेची ऊब आणि पोटभर रुचकर व मिष्टान्न भोजन देण्यात आला. विशेष म्हणजे, स्वतः त्या निरागस बालकांमध्ये बसून भोजन करतगावातील मुले म्हणजे आपलीच मुलेही भावना शब्दांत नव्हे, तर कृतीतून साकार करून दाखवली. या वात्सल्यपूर्ण, ममत्वाने ओतप्रोत वर्तनाबद्दल प्रतिष्ठित नागरिकांनी शब्दातीत कृतज्ञता व्यक्त केले.

या पुण्यकार्याच्या प्रेरणास्थानी असलेले शिवपाद अंकलगी, शारदाबाई अंकलगी, सूर्यकांत अंकलगी उद्योजक मल्लिनाथ अंकलगी व संपूर्ण अंकलगी परिवार, मित्रपरिवार आणि अथक परिश्रम घेऊन स्वादिष्ट व गरमागरम पदार्थ तयार करणाऱ्या माताभगिनीना शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती व सर्व चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या वतीने मनःपूर्वक, अंतःकरणापासून नतमस्तक होऊन आभार व्यक्त करण्यात आले.

हा वनभोजन कार्यक्रम केवळ भोजनापुरता मर्यादित न राहता, माणुसकी,सामाजिक बांधिलकी व सेवाभाव यांचा जिवंत वस्तुपाठ ठरला आहे. आपल्या परिवाराने दाखवलेली ही आत्मीय सेवा आमच्या स्मरणात सदैव तेजस्वी दीपस्तंभासारखी उजळत राहील.या पवित्र उपक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा द्विगुणित करणारे व बालकांच्या आनंदात मनसोक्त सहभागी झालेले माजी सरपंच वीरभद्र सलगरे, महान्तेश्वर पाटील, मल्लिनाथ सलगरे, हणमंतराया बिराजदार, देवेंद्र बिराजदार, मल्लिकार्जुन पाटील, गणेश माने, प्रभाकर विजापूरे, सिद्धाराम सुतार, शरणप्पा बमदे, यल्लप्पा पूजारी, बसय्या स्वामी, केदार बमदे, मल्लिनाथ म्हेत्रे, चौडप्पा सोलापूरे, सिद्दाराम सुतार, चंद्रकांत अंकलगी, प्रकाश पाटील, मल्लिनाथ पाटील विजय नरवडे, संगमेश्वर पाटील, लक्ष्मण माने, मल्लिनाथ कुंभार, बसवराज खानापुरे, बसवराज कुंभार, मल्लिनाथ जबगी बाबुशा माळी व शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी ऋणी व्यक्त केले.

**सामाजिक उपक्रम अंकलगी परिवाराकडून मागील १० वर्षांपासून निरंतर चालू आहेत, दिवाळीला सर्व मित्रपरिवाराला दिवाळी देणे, गावातील यात्रा महोत्सवात महाप्रसाद वाटप करणे,शाळेतील मुलांना १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला खाऊ व वही पुस्तक वाटप करणे असे अनेक उपक्रम सूर्यकांत अंकलगी व मल्लिनाथ अंकलगी हे नेहमी करत असतात.असे सामाजिक कार्य अंकलगी परिवारांचे स्तुत्य उपक्रम प्रेरणादायी आहेत.**

**- मल्लिनाथ म पाटील**

**सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ता गौडगाव बु!**

अशा उदात्त, समाजोपयोगी व शिक्षणप्रेमी उपक्रमांची परंपरा निरंतर चालू राहिल आणि चिमुकल्या पिढीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अशीच सेवाभावाची गंगा अखंड चालू राहणार आहेत.

# सोलापूर महानगरपालिकेत भाजपचा झेंडा, मुख्यमंत्री फडणवीसांकडून पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे अभिनंदन

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जुन्या नव्यांचा समन्वय साधत प्रभावी पक्ष बांधणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या अवध पूर्व यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री तथा ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांचे पेढा भरून अभिनंदन केले. ऐतिहासिक विजयात योगदान देणाऱ्या भाजपच्या लोकप्रतिनिधी पदाधिकारी नेते व कार्यकर्त्यांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी तोंड भरून कौतुक केले.

पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यापासून जयकुमार गोरे यांनी सोलापूर शहरातील रखडलेली विकास कामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विचार करून त्यांनी संघटना मजबूत करत नवे सहकारी जोडले आणि जुन्या नव्यांचा समन्वय साधत प्रभावी पक्ष बांधणी केली. विकास कामांना विकास कामांना गती देण्याचे आली व पाणीपुरवठा स्वच्छता नागरी सुविधा यासाठी आवश्यक निधी मिळवण्यात आला व तसेच रखडलेल्या विमानसेवीचा प्रश्नही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्याकडून सोडवण्यात आला. विमान सेवा सुरू करण्यात व आयटी पार्क मंजुरीसाठी ठोस प्रयत्न करण्यात आले.

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आखलेले प्रभावी रणनीतीला आमदार सचिन कल्याण शेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आणि भाजप शहराध्यक्ष रोही तळवळकर यांनी सक्रिय साथ दिली व या संघटित प्रेरणामुळे भाजपला सोलापूर महानगरपालिकेत मोठा आणि निर्णायक विजय मिळाला.

प्रचार काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर शहरात सभा घेऊन विकासाला स्पष्ट आराखडा मांडला होता. त्यांचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून सोलापूरकरांनी भाजपवर पुन्हा एकदा विश्वास दाखवत एक हाती सत्ता बहाल केली आहे.

महानगरपालिका निवडणुकीतील विजयानंतर शनिवारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी आगामी काळात सोलापूरची विस्तारित विमानसेवा. समतोल पाणीपुरवठा योजना. व आयटी पार्क एमआयडीसीतील पायाभूत सुविधा, आधी सर्व विकासकामे मार्गी लावण्यासाठी भाजप सरकार कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

---

## मा. तहसीलदारांच्या हस्ते श्री बालाजी मंदिरात सपत्नीक महाअभिषेक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे,येथील श्री बालाजी मंदिरात कळंबचे तहसीलदार श्री.हेमंतजी ढोकले व सौ. माधवी ढोकले यांच्या हस्ते भगवान श्री व्यंकटेश यांचा शुक्रवार महाअभिषेक संपन्न झाला निमित्त होते वाढदिवसाचे विशेष म्हणजे तहसीलदार पती-पत्नीचा वाढदिवस एकाच दिवशी आहे. पहाटे पाच वाजता श्री गणेश पूजा, विश्वसेन आराधना आणि नवग्रह पूजा करून दूध दही, लोणी, साखर, मध, तूप आदी पंचामृतने श्री बालाजी भगवान यांचा अभिषेक विधी मंदिराचे पुजारी श्री राम प्रपन्नाचार्य महाराज यांच्या मंत्रोच्चारात करण्यात आला.

नुकतेच श्री बालाजी मंदिरात झालेल्या वैकुंठ एकादशी आणि कल्याण उत्सव यांच्या बातम्या आणि व्हिडिओ पाहून तहसीलदारांना मंदिरास भेट देण्याची इच्छा झाली आणि श्री वेंकटेशाच्या भक्तीने वाढदिवस साजरा करण्याचा योग घडून आला. दाक्षिणात्य पद्धतीचे मंदिर बांधकाम , तिरुपती येथील खुद्द बालाजी देवस्थानाची मूर्ती आणि नित्य नियमित होत असलेले पूजा उपचार याने ते भारावून गेले. जन्मदिवस ,लग्नाच्या वाढदिवस किंवा अन्य औचित्य साधून मंदिरामध्ये दररोज भक्तांमार्फत आरती आणि प्रसादाचे आयोजन केले जाते . याप्रमाणे सर्वच बालाजी भक्तांना अभिषेक, आरती प्रसादाची संधी दिली जाते ,याचे कौतुक तहसीलदारांनी केले. यावेळी तहसीलदारांचा शाल, श्रीफळ देऊन या यथोचित सन्मान करण्यात आला. समाजसेवे सोबत आध्यात्मिक जोड असलेले तहसीलदार कळंबला लाभले, यासाठी बालाजी भक्तांकडून आनंद व्यक्त करण्यात आला.

---

## भीमा सहकारी साखर कारखान्याची माझी व्हाईस चेअरमन कल्याण बप्पा पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात केला जाहीर प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुक्याच्या राजकारणातील ज्येष्ठ नेतृत्व, व भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन कल्याण बप्पा पाटील त्यांनी त्यांच्या सहकार्याचा आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

मा.आ. प्रशांतराव परिचारक व माजी आमदार यशवंत तात्या माने यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. फुलचिंचोली तालुका पंढरपूर येथील सरपंच नारायण जाधव बिळनसिद्ध पुजारी युवा नेते रमाकांत नाना पाटील यांच्यासह आणि कार्यकर्त्यांनी भाजपचे विचारधारा स्वीकारले आहे,

रवि परिचारक म्हणाले की, या अनुभवही नेतृत्वामुळे पंढरपूर तालुक्यात भारतीय जनता पक्षाची व पांडुरंग परिवाराची ताकद निश्चितच वाढणार आहे सर्व नूतन सदस्याचे पक्षात सहर्ष स्वागत करण्यात आले.

यावेळी जेष्ठ दिनकर भाऊ मोरे, दिलीपराव चव्हाण, दाजी पाटील भुसनर, सुभाष मस्के, कैलास खुळे सर, राजू बापू गावडे, बाबासाहेब पाटील, बंडू नाना पवार, भास्कर कस गावडे, अतुल पवार, इत्यादी सह इतर उपस्थित होते.

---

## प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी दिल्लीत एअरस्पेस राहणार बंद, तब्बल ६०० हून अधिक विमानांवर होणार परिणाम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : २१ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीत दिल्लीचे हवाई क्षेत्र दररोज काही तासांसाठी बंद राहील. याचा अर्थ असा की या काळात कोणतीही विमाने दिल्लीत उतरू किंवा उतरू शकणार नाहीत. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणूनच, शेवटच्या क्षणी होणाऱ्या त्रासांपासून वाचण्यासाठी प्रवाशांनी आगाऊ तयारी करणे महत्त्वाचे आहे. विशेषत: ज्यांना तातडीने प्रवास करायचा आहे त्यांनी त्यांच्या विमानाचे वेळापत्रक आणि स्थिती वारंवार तपासावी. अचूक माहिती असल्याने कोणत्याही समस्या टाळता येतील.

हवाई क्षेत्र का बंद केले?

दरवर्षी, दिल्लीत प्रजासत्ताक दिनाची व्यापक तयारी होते. परेड, तालीम, ड्रेस रिहर्सल, भारतीय हवाई दलाचे उड्डाणपूल आणि राजपथावरील व्हीआयपींच्या हालचालींमुळे सुरक्षा व्यवस्था कडक केली जाते. या कारणास्तव, सरकारने २१ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान दिल्लीवरून विमानांची वाहतूक तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी एक नोटम (विमानचालकांना सूचना) देखील जारी करण्यात आली आहे. त्याचा उद्देश आकाशाची संपूर्ण सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि कोणत्याही धोक्यांपासून बचाव करणे आहे.

उड्डाणे 'या' काळात बंद राहणार?

सरकारी आदेशानुसार, २१ जानेवारी ते २६ जानेवारीपर्यत दररोज सकाळी १०.२० ते दुपारी १२.४५ पर्यत दिल्लीचे हवाई क्षेत्र पूर्णपणे बंद राहील. याचा अर्थ असा की सुमारे अडीच तासांसाठी कोणतेही विमान दिल्लीत उड्डाण किंवा उतरू शकणार नाही. या काळात, उड्डाणे पूर्णपणे थांबवली जातील. जरी हा वेळ मर्यादित असला तरी, दिवसभराच्या उड्डाणांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. अनेक उड्डाणे उशिरा येऊ शकतात किंवा त्यांचे वेळापत्रक बदलले जाऊ शकते. म्हणून, प्रवाशांनी या वेळेची जाणीव ठेवावी आणि त्यानुसार त्यांच्या प्रवासाचे नियोजन करावे.

६०० हून अधिक उड्डाणे प्रभावित

दिल्लीचे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वात व्यस्त विमानतळ आहे. या विमानतळावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात आणि दररोज शेकडो उड्डाणे निघतात. आता, अडीच तासांच्या ब्रेकसह, अनेक उड्डाणांवर परिणाम होईल. विमान कंपनी सिरियमच्या मते, या सहा दिवसांत ६०० हून अधिक उड्डाणे प्रभावित होऊ शकतात. काही उड्डाणे पुन्हा वेळापत्रकबद्ध केली जाऊ शकतात, तर काही रद्द केली जाऊ शकतात. शिवाय, जानेवारी असल्याने धुके ही एक महत्त्वाची समस्या आहे. यामुळे विलंब आणि रद्द होण्याची शक्यता वाढते. कनेक्टिंग फ्लाइट असलेल्या प्रवाशांनी विशेषत: सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

प्रवास करण्यापूर्वी तुम्ही कोणती खबरदारी घ्यावी?

जर तुम्ही २१ ते २६ जानेवारी दरम्यान तिकीट बुक केले असेल, तर विमानतळावर जाण्यापूर्वी तुमच्या फ्लाइटची स्थिती तपासा. तुमच्या एअरलाइन्सकडून येणारे कोणतेही संदेश, ईमेल किंवा कॉल काळजीपूर्वक वाचा. कोणत्याही बदलांना चांगल्या प्रकारे सामावून घेण्यासाठी नेहमीपेक्षा थोडे लवकर विमानतळावर पोहोचण्याचा प्रयत्न करा. जर तुमच्याकडे कनेक्टिंग फ्लाइट असतील, तर त्या दरम्यान जास्त वेळ द्या. यामुळे सुरक्षित आणि अधिक आरामदायी प्रवास सुनिश्चित होईल. प्रजासत्ताक दिनाच्या सुरक्षेसाठी ही बंदी आवश्यक आहे.

---

## मंद्रूप कृषी प्रदर्शनाला चाळीस हजार शेतकऱ्यांनी दिली भेट; शेती अवजारे, ट्रक, ट्रॅक्टर, स्टॉल व ठरले आकर्षण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुद्रुप येथे श्री माळसिद्ध यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या कृषी व पशुप्रदर्शनाला चार दिवसात तब्बल ४० हजार शेतकऱ्यांनी नागरिक युवक आणि महिला वर्गणी भेट देऊन या प्रदर्शनाचा लाभ घेतला आहे. जवळपास दोन कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाले आहे मंद्रूप येथे श्री मुळसिद्ध यात्रेनिमित्त पत्रकार पंचाक्षरी स्वामी यांच्या संकल्पनेतून दिनांक १३ १४ १५ आणि १६ जानेवारी असे चार दिवस हे कृषी प्रदर्शन आयोजन केले आहे. त्याचे उद्घाटन माजी आमदार राजन पाटील यांच्या हस्ते तर आमदार सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते. श्री मळसिद्ध देवस्थान यात्रा कमिटीचे अध्यक्ष अँड राजेश देशमुख श्री मळसिद्ध देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रदर्शन संपन्न झाले या प्रदर्शनाला दक्षिण सोलापूर जिल्हा विजयपूर जिल्ह्यातील हजारो शेतकरी बांधवांनी लाभ घेतला आहे या प्रदर्शनात विविध ट्रॅक, शेतीपूरक विविध तांत्रिक अवजारे यंत्रसामग्री, ट्रॅक्टर, दुचाकी आणि चार चाकी वाहने या सर्व विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात विक्री झाली आहे. जवळपास दोन कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे. या प्रदर्शनात शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान आवजारे, मशिनरी, बी ,बियाणे खते, औषधांची माहिती मिळाली. पिकांचे उत्पादन वाढीसाठी योग्य ते मार्गदर्शन मिळाले आहे मंद्रूप येथे प्रथमच ही कृषी प्रदर्शन वाईट केल्याने शेतकऱ्यांनी ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. हे कृषी प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी मळसिद्ध देवस्थान यात्रा कमिटीचे अध्यक्ष अँड राजेश देशमुख श्री मळसिद्ध देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, पत्रकार पंचाक्षरी स्वामी सुनील होनमाने, राधाकृष्ण गोसावी, बळीनसिद्ध सुलटे, तमन्ना पुजारी बाबूशा देशमुख, पाटील सिकंदर आवटे आदींनी परिश्रम घेतले आहे.

---

### प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना होणार या कराराचा फायदा

## 'बीडा' आणि 'स्वेरी' यांच्यात सामंजस्य करार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशन (बीडा), बारामती आणि गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील 'स्वेरी' अर्थात श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार (एमओयु) करण्यात आला असून या करारामुळे विद्यार्थ्यांमध्ये व प्राध्यापकांमध्ये उद्योजकता, उद्योग-संपर्क व प्रात्यक्षिक शिक्षण यांना विशेष चालना मिळणार आहे.

स्वेरी मध्ये आयोजिलेल्या या सामंजस्य कराराच्या कार्यक्रमास बारामती एमआयडीसी मधील ७०० हून अधिक उद्योगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'बीडा' या औद्योगिक संघटनेचे विविध अधिकारी उपस्थित होते. यामध्ये बीडा संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, सचिव अनंत अवचट, कार्यकारी समिती सदस्य महादेव गायकवाड, संभाजीराव माने आणि इन्फोर्स इंजिनिअरिंग सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापक अमोल रनसिंग आदी मान्यवर उपस्थित होते. हे सर्व प्रथम पिढीतील यशस्वी उद्योजक असून, त्यांनी विद्यार्थ्यांशी आपले प्रेरणादायी अनुभव शेअर करत आजच्या स्पर्धात्मक वातावरणात उद्योजकतेचे महत्त्व व गरज अधोरेखित केली. यावेळी बीडा संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. यामध्ये बारामती एमआयडीसी मधील उद्योगांना भेटी, इंटर्नशिप, लाईव्ह प्रोजेक्ट्स, प्राध्यापकांसाठी उद्योग-संपर्क तसेच स्वेरीमध्ये उद्योगधंद्यात यशस्वी ठरलेल्या उद्योग तज्ज्ञांची प्रेरणादायी व्याख्याने यांचा समावेश आहे. यावेळी स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी 'कष्ट, शिस्त आणि उद्योगतज्ज्ञांकडून शिकण्याचे महत्त्व' यावर प्रकाश टाकत, यशस्वी उद्योजकतेसाठी हे मूलभूत घटक असल्याचे स्पष्ट केले. तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एन. बी. पासलकर यांनी दृढ इच्छाशक्ती व प्रात्यक्षिक कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करत व्यावसायिक उत्कृष्टतेसाठी ते आवश्यक असल्याचे अनुभवातून सांगितले. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून स्वेरीमधील विद्यार्थी उद्योगासाठी परिपक्व बनविण्यासाठी पदवीधर घडविणे, विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेची मानसिकता विकसित करणे आणि प्रभावी उद्योग-सहकार्य वाढविणे यामध्ये मोलाचा ठरणार आहे. या सामंजस्य करारावर स्वेरीच्या वतीने संस्थेचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांचे तर बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशन (बीडा) च्या वतीने संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी स्वाक्षरी केली आहे. हा सामंजस्य करार झाल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, पालक व विद्यार्थ्यांनी असोसिएशन व स्वेरीचे आभार मानले.